# कोल्हापूर महानगरपालिका
## राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM)
## एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी.

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

### राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत कंत्राटी पद भरती जाहीरात सन २०२६-२७

कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबविणेत येणा-या विविध कार्यक्रमासाठी कोल्हापूर महानगरपालिका एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीकरीता खालील तक्त्यामध्ये दर्शविलेप्रमाणे एकत्रीत मानधनावर कंत्राटी रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकारी या पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत. खालील नमूद केलेली पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून राष्ट्रीय आरोग्य अभियान धोरणानुसार पदाची नियुक्ती ही २९ जून २०२६ अखेर राहील.

| अ क्र | पदाचे नांव | कमाल वयोमर्यादा | शासन मान्यताप्राप्त संस्थेची शैक्षणिक अर्हता | एकत्रीत मानधन | एकूण भरावयाची पदे | जातीचा प्रवर्ग पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत) | खुला करीता १८ ते ३८ वर्ष व इतर संवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे इतकी राहिल | MBBS | ६०,०००/- | ४ | अज-१, विजा-अ -१ एसईबीसी-१ खुला-१ |

<u>महत्वाच्या सुचना</u> :-

१. सदर पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण संबंधी दावा करणेचा अधिकार राहणार नाही.

२. सदर रिक्त पदांच्या संख्येत, शैक्षणिक आर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण, नमुद केलेल्या अटी शर्तीमधील बदल करणेचे सर्व अधिकार तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करणेचे व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार हे निवड समिती अध्यक्ष तथा आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

३. सन २०२६-२७ च्या कृती आराखडयामध्ये सदर पदाची मंजूरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा अपोआप संपुष्टात येईल परंतू वरील पदे सन २०२६-२७ मध्ये मंजूर झालेनंतर आपले काम समाधानकारक असलेसच पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती देणेत येईल.

४. नियुक्त करणेत आलेल्या उमेदवारास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार रु.५००/- चे स्टँम्प पेपरवर लिहून नोटरी करुन द्यावा लागेल. करार पत्राचे अधिन नियुक्ती असेल.

५. या पदासाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे इतकी राहील.

६. शासन सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी.

७. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना अदा करावयाचे ठोक मानधन मा.सह संचालकसो (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे दिनांक १६/१/२०१७ रोजीचे पत्रान्वये देय राहील. तसेच पत्रामध्ये नमूद इतर अटी लागू राहतील.



Scanned with CamScanner

८. बिंदु नामावलीनुसार राखीव प्रवर्गातील उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झालेस रिक्त पदी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देणेत येईल परंतू मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झालेस खुल्या प्रवर्गातील झालेल्या उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात येईल.

९. पात्र उमेदवार यांचेवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेचे निदर्शनास आलेस झालेली नियुक्ती रद्द करणेत येईल.

१०. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी. यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरीक व मानसीक दृष्ट्या सक्षम असलेचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

११. अर्हताधारक उमेदवारांनी खालील विहीत करणेत आलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावेत.

१२. पात्र उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने निर्धारीत वेळेत उपस्थित रहाणेचे आहे. याकरीता कोणताही प्रवास व इतर कोणताही भत्ता देणेत येणार नाही.

१३. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी पूर्ण करतात याबाबत प्रथम खात्री करून घ्यावी व त्यानंतरच अर्ज करावेत.

१४. ज्या पदासाठी उमेदवारांना अर्ज करावयाचा आहे त्या पदासाठी जाहिरातीमध्ये दर्शविलेली अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१५. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाची किमान व कमाल वयोमर्यादा जाहीरात दिनांकास सापेक्ष समजण्यात येईल.

१६. अपूर्ण माहितीचे अथवा विहित केलेली अर्हता नसलेल्या उमेदवारांचे अर्ज कोणतेही कारण न देता रद्दबातल ठरविणेत येतील यासाठी उमेदवारास लेखी कळविणेत येणार नाही.

१७. सदर भरती प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस निवड/प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

१८. हजर दिनांकापासून किमान ६ महिने सेवा देणे बंधनकारक राहील.

<u>अर्ज करण्याची पध्दत</u> :-

१) उमेदवाराने जाहिरातीमध्ये दिलेल्या विहित नमुन्यातच संगणकिकृत अर्ज करावा.

२) उमेदवाराने अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव व सामाजिक आरक्षणाबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावे.

३) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज, मूळ सर्व कागदपत्रासह व साक्षांकित प्रतींसह श्री पंचगंगा रुग्णालय, दुसरा मजला, आरसीएच कार्यालय कोल्हापूर येथे प्रत्येक सोमवारी सकाळी १० ते १२ या वेळेत अर्ज स्वीकारणेत येऊन त्याच दिवशी दुपारी ३ वाजता मुलाखत घेऊन निवड करणेत येणार आहे.

४) अर्जासोबत पुढील आवश्यक कागदपत्रांची साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात. त्यामध्ये शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, पदानुसार संबंधीत कौन्सिलकडे रजिस्ट्रेशन केलेले नोंदणी प्रमाणपत्र, जन्म नोंदीचा पुरावा असलेले प्रमाणपत्र, राखीव उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे नमूना अ प्रपत्र, पासपोर्ट आकाराचे २ फोटो, शासकीय सेवेतून सेवा निवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांचे शेवटच्या प्राप्त पगाराची स्लीप अथवा कार्यालयाकडील वेतनाचा दाखला.

५) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, पुर्वानुभव, व इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात व मुलाखतीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्राच्या मुळ प्रतींसह उपस्थित रहाणेचे आहे.

६) पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

उपायुक्त-२
कोल्हापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

कोल्हापूर महानगरपालिका
राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM)
एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत कंत्राटी पद भरती जाहीरात सन २०२६-२७

कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबविणेत येणा-या विविध कार्यक्रमासाठी कोल्हापूर महानगरपालिका एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीकरीता खालील तक्त्यामध्ये दर्शविलेप्रमाणे एकत्रीत मानधनावर कंत्राटी रिक्त मायक्रोबायोलॉजिस्ट यांची थेट मुलाखत (प्रत्येक सोमवारी तसेच एपिडेमिओलॉजिस्ट या पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत. खालील नमूद केलेली पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून राष्ट्रीय आरोग्य अभियान धोरणानुसार पदाची नियुक्ती ही २९ जून २०२६ अखेर राहील.

| अ क्र | पदाचे नांव | शासन मान्यताप्राप्त संस्थेची शैक्षणिक अर्हता | एकत्रीत मानधन | एकूण भरावयाची पदे | जातीचा प्रवर्ग पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | मायक्रोबायोलॉजिस्ट | MBBS With MD Microbiology from institute recognized by medical council of India, MMC Councile of India Reg. & 1 Yr. Experience | ७५००० | १ | एकांकी पद असलेने सामाजिक आरक्षण लागू नाही. |
| २ | एपिडेमियोलॉजिस्ट | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health, MMC Councile of India Reg. &1 Yr. Experience | ३५००० | १ | |

<u>महत्वाच्या सुचना</u> :-

१.सदर पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण संबंधी दावा करणेचा अधिकार राहणार नाही.

२. पदासमोर नमूद केलेले मानधन हे एकत्रीत मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत.

३. निवड झालेल्या उमेदवारांना दि.२९/६/२०२६ पर्यतच्या कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. त्यापुढील कालावधीकरीता राज्य आरोग्य सोसायटी मुंबई यांचेकडून अभियान सुरु ठेवणेस व पदांना मंजूरी मिळालेनंतर तसेच मागील कालावधीत काम समाधानकारक असल्यासच पुढील १ वर्ष कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल.

४. पदांची संख्या, शैक्षणिक आर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजीक आरक्षण तसेच अटी व शर्तीमध्ये गरजेप्रमाणे बदल करणेची शक्यता आहे. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार हे निवड समिती अध्यक्ष तथा आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

५. नियुक्त करणेत आलेल्या उमेदवारास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर लिहून नोटरी करुन यावा लागेल. करार पत्राचे अधिन नियुक्ती असेल.

६. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे दिनांक २२/ ५/२०२६ रोजी उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३८ वर्षे राहील. परंतू अतिविशेष तज्ञ, विशेषतज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची सेवा प्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ७० वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारीरीकदृष्टया सक्षम असलेचे प्रमाणपत्र अर्जासोबत व कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील. तसेच पुढील प्रत्येक पुनर्नियुक्तीचे वेळी सदर प्रमाणपत्र सादर करावे लागेल.



Scanned with CamScanner

७. शासन सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी.

८. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना अदा करावयाचे ठोक मानधन मा.सह संचालकसो (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे दिनांक १६/१/२०१७ नुसार देय राहील. तसेच पत्रामध्ये नमूद इतर अटी लागू राहतील.

९. पात्र उमेदवार यांचेवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेचे निदर्शनास आलेस झालेली नियुक्ती रद्द करणेत येईल.

१०. अर्हताधारक उमेदवारांनी खालील विहीत करणेत आलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावेत.

११. मायक्रोबायोलॉजिस्ट या पदाकरीता थेट मुलाखत घेऊन पद भरणेत येणार आहे. या पदाची मुलाखत प्रत्येक सोमवारी सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज स्वीकरणेत येणार असून त्याच दिवशी दुपारी ३ वाजता गठीत करणेत आलेल्या समितीद्वारे मुलाखत घेऊन राबविणेत येईल. मुलाखतीच्या वेळी कागदपत्रांच्या मुळ प्रतीसह उपस्थित रहाणेचे आहे. यामध्ये काही बदल झालेस महापालिकेच्या www.kolhapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्दी करणेत येईल.

१२. तसेच एपिडेमिओलॉजिस्ट या पदाकरीता अर्ज करणा-या इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज विहीत नमून्यात कार्यालयीन कामकाजाचे वेळी दिनांक 22 /5/२०२६ ते 22/5/२०२६ अखेर मा.आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ---------------- पदाकरीता अर्ज असा लिफाफ्यावर उल्लेख करुन वेळेत पोहोच होईल याप्रमाणे सादर करावयाचा आहे.

१३. निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, भरती प्रक्रियेची माहिती महापालिकेच्या www.kolhapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्दी करणेत येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवाराशी केला जाणार नाही.

१४. एपिडेमिओलॉजिस्ट या पदासाठी प्राप्त झालेले उमेदवारांचे अर्ज छाननी अंती पदानुसार पदवी/पदविका, पदाच्या आवश्यक Qualifying exam मधील अंतिम वर्षाच्या गुणाच्या टक्केवारीच्या आधारे, पदासाठी आवश्यक शैक्षणिक आर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक आर्हता असलेस तसेच संबंधीत पदाचे निगडीत अनुभव यामधील मिळालेल्या गुणांचे टक्केवारीप्रमाणे उमेदवारांची गुणांकन यादी तयार करुन उमेदवारांची नियुक्ती करणेत येणार आहे.

१५. मायक्रोबायोलॉजिस्ट या उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने निर्धारीत वेळेत उपस्थित रहाणेचे आहे.

१६. अर्ज करण्यापूर्वी संबंधीत उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी पूर्ण करतात याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच अर्ज करावेत.

१७. ज्या पदासाठी उमेदवारांना अर्ज करावयाचा आहे त्या पदासाठी जाहिरातीमध्ये दर्शविलेली अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१८. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाची किमान व कमाल वयोमर्यादा जाहीरात दिनांकास सापेक्ष समजण्यात येईल.

१९. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकिची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती पुर्वसुचना न देता रद्द करणेत येईल. तसेच आवश्यक असल्यास प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२०. उमेदवारांनी अर्ज सादर करताना त्यांचे अद्ययावत असलेले ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक अचुक नोंदवावे. तसेच ते भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

२१. महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमूना-अ या प्रपत्रात अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.



Scanned with CamScanner

२२. अपूर्ण माहितीचे अथवा विहित केलेली अर्हता नसलेल्या उमेदवारांचे अर्ज कोणतेही कारण न देता रद्दबातल ठरविणेत येतील यासाठी उमेदवारास लेखी कळविणेत येणार नाही.

२३. अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणलेस त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल.

**अर्ज करण्याची पध्दत :-**

१) उमेदवाराने जाहिरातीमध्ये दिलेल्या विहित नमुन्यातच संगणकिकृत अर्ज करावा.

२) विहीत नमुन्यात अर्ज साक्षांकित प्रतींसह मा.आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांचे नांवे मुख्य इमारत भाऊसिंगजी रोड, सी वॉर्ड कोल्हापूर या पत्यावर दिनांक 22/5/२०२६ ई.रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोच होतील अशा पध्दतीने पाठवावेत.

३) अर्जासोबत पुढील आवश्यक कागदपत्रांची साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात. त्यामध्ये शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, पदानुसार संबंधीत कौन्सिलकडे रजिस्ट्रेशन केलेले नोंदणी प्रमाणपत्र, जन्म नोंदीचा पुरावा असलेले प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र. तसेच इतर अनुषंगिक कागदपत्र, पासपोर्ट आकाराचे २ फोटो, साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात.

४) पात्रता, अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

मा.उपायुक्तसो-२
कोल्हापूर महानगरपालिका



Scanned with CamScanner